ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिक्षा अंतिम करणे बाबत.( श्री.राजेंद्र यशवत मुसमाडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत खिर्डी व वांगी बु. तालुका श्रीरामपूर )

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग /ग्रापं-३/ ११८५६११ /२०२५
दिनांक-२८/०४/२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/८३० /२०२१ दिनांक २४/१२/२०२१
२. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२ /ग्रापं-३/३५६/२०२२ दिनांक- २७/०४/२०२२
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र विशा.४/खाचौ/सी.आर.७७/२०२२ दिनांक २८/१२/२०२२
४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( २ )
६. जा.क्र.साप्रवि२/ग्रांप ३/२३०/२०२३ अ.नगर दि.२३/०३/२०२४(अंतिम कारणे दाखवा नोटीस)
७. श्री.राजेंद्र यशंवत मुसमाडे यांनी सादर केलेला खुलासा १३/०७/२०२३

ज्या अर्थी श्री.राजेंद्र यशंवत मुसमाडे तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत खिर्डी व वांगी बु. तालुका श्रीरामपूर यांनी ग्रामपंचायत कार्यालीयन कामी गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्र ३ नुसार प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला असुन त्यामध्ये आरोप क्र. १,२,३,५,६ सिध्द झालेले असुन आरोप क्रमांक ४ हा अशं:ता सिध्द झाल्याने , विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास शिस्त विषयक प्राधिकरण सहमत असल्याने , व श्री.मुसमाडे यांनी जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( २ ) नुसार त्यांना पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने चार वर्षा करिता रोखणे हि शिक्षा का करणेत येऊ नये ? या बाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्या बाबतचा खुलासा दहा दिवसाचे आत सादर करणे व दिलेल्या मुदतीत खुलासा प्राप्त न केल्यास नोटीस मधील शिक्षा तुम्हांस मान्य आहे,असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल नमुद करण्यात आलेले होते.संदर्भ क्रमांक ०७ अन्वये श्री.मुसमाडे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांनी या प्रकरणी खुलासा सादर केलेला आहे.श्री.राजेंद्र यशंवत मुसमाडे यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त त्यांनी सादर केलेल्या नोटीसचे खुलाश्यात तथ्य दिसून येत नसल्याने व

चौकशीतील दोषारोप सिध्द झाले असल्याने त्यांचा खुलासा अमान्य करण्यात आलेला आहे. सबब मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा शिस्तविषयक

प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.राजेंद्र यशवंत मुसमाडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांना देय होणारी पुढील वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायम परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षा करिता रोखणेची शिक्षा अंतिम करीत आहे.

या आदेशाची नोंद संबंधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202408250800044 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 28-04-2025 13:47:31
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:- श्री.राजेंद्र यशवंत मुसमाडे तत्कालीन ग्रामसेवक ता.श्रीरामपूर सध्या कार्यरत ता. नेवासा

२/- सदरची नोटीस संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत- गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा/ श्रीरामपूर यांना पुढील कार्यवाही साठी